## पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर

## पोलीस शिपाई भरती सन २०१८

## तात्पुरती निवड यादी (Provisional Selection List)

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापनेवर " **पोलीस शिपाई / बॅन्डस्मन** " यांची ३० रिक्त पदे जाहिरातीनुसार भरण्यासाठी दिनांक १२ मार्च, २०१८ पासून भरती प्रक्रिया आयोजित करण्यांत आली. **जाहिरातीमध्ये या कार्यालयाच्या आस्थापनेवर बँड पथकातील ०५ रिक्त पदे भरतीसाठी उपलब्ध आहेत असे नमूद करण्यांत आले आहे.** या आस्थापनेवर दिनांक ०१-०१-२०१८ ते ३१-१२-२०१८ अखेरपर्यंत रिक्त होणा-या संभाव्य पदांची गणना करुन रिक्त पदे जाहिर करण्यांत आलेली आहेत. सदरची रिक्त पदे **सामाजिक आरक्षणांतर्गत** मागील अनुशेष व बिंदूनामावलीनुसार तसेच **समांतर आरक्षणांतर्गत** निश्चित करण्यांत आलेली आहेत.

बॅन्डस्मन पदाच्या उमेदवारांची अर्हता ही वेगळी असल्याने त्यांच्यासाठी वेगळी लेखी परीक्षा घेण्यांत येते. **त्यामुळे प्रथम बॅन्डस्मन पदाच्या उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार ५ उमेदवारांची निवड करुन, तेवढी प्रवर्गनिहाय पदे कमी करुन, पोलीस शिपाई पदाच्या उमेदवारांच्या गुणवत्ता यादीमधून सामाजिक / समांतर आरक्षणानुसार पोलीस शिपाई पदासाठी २५ उमेदवारांची निवड करण्यांत आलेली आहे.** अशा प्रकारे जाहिरातीनुसार **रिक्त ३० पदांसाठी निवड** करण्यांत आलेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी घोषित करण्यांत आलेली आहे.

**सदरची तात्पुरती निवड यादी असून त्यामध्ये दर्शविलेली पदे, आरक्षण व तांत्रिकदृष्टया यात बदल होण्याची शक्यता आहे.** त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिका-यास म्हणजेच पोलीस आयुक्त,

अमरावती शहर यांना राहतील. त्याबाबत उमेदवाराचा कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही. पोलीस भरतीतील प्रक्रियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील व उमेदवारास बंधनकारक राहील.

उमेदवारांची गुणवत्ता यादीतील निवड, भरती निकषांची पुर्तता आणि आवश्यक ती मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रांची अंतिम पडताळणी / आवश्यक ती पुर्तता, वैद्यकीय चाचणी अहवाल, चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवालास अधीन राहून करण्यात येईल. निवड यादीतील उमेदवारांची निवड तात्पुरत्या स्वरुपाची असेल. **निवड यादीत नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येऊ नये.**

सदरची तात्पुरती निवड यादी या कार्यालयाच्या व पोलीस मुख्यालय, अमरावती शहर च्या सुचना फलकावर तसेच www.amravaticitypolice.gov.in व www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यांत आलेली आहे.

अमरावती
दि. ०७-०४-२०१८

( दत्तात्रय मंडलिक )
पोलीस आयुक्त तथा अध्यक्ष,
पोलीस भरती निवड समिती २०१८,
अमरावती शहर